# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 26.03.2024** **वार-मंगळवार**

---

1) आगामी निवडणूक पर्यावरणपूरक करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शक तत्वं जारी

2) पूर्व विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघांच्या पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रमुख उमेदवारांच्या नावांची घोषणा

3) राज्यात सर्वत्र धुलिवंदनाचा सण उत्साहात साजरा

4) अहमदनगरमध्ये झालेल्या ७०व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत हरियाणा अजिंक्य

**निवडणूक आयोग**

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक पर्यावरणपूरक असावी यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांसाठी मार्गदर्शक तत्वं जारी केली आहेत. मतदार यादी आणि निवडणूक साहित्यासाठी कागदाचा कमीत कमी वापर करावा, शक्यतो ई-बुक्स आणि ई-दस्तऐवजांचा वापर करावा, प्रिंट घेताना ती एका पानावर पाठपोट घ्यावी, एकदाच वापरता येण्याजोग्या प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळावा, संकलनाची स्वतंत्र व्यवस्था असावी, प्रत्येक प्रकारच्या कचऱ्यासाठी विल्हेवाटीची व्यवस्था असावी, वाहतुकीसाठी पर्यावरणपूरक वाहनं वापरवीत, एकाच वाहनांतून अनेकांनी प्रवास करावा, सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य द्यावं, राजकीय पक्षांनी आपल्या प्रचार कार्यक्रमांमध्ये अक्षय ऊर्जेचा वापर करावा अशा सूचनांचा यात समावेश आहे.

**विदर्भ निवडणूक**

पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघात पहिल्या टप्प्यामध्ये निवडणूक होणार असून इथल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसनं केली आहे. भाजपातर्फे भंडारा-गोंदिया मतदार संघातून सुनिल मेंढे, तर गडचिरोली-चिमूर मतदारसंघातून अशोक नेते यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. काँग्रेसनं चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी दिली आहे. या मतदार संघात भाजपनं सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे.भंडारा- गोंदिया लोकसभा मतदार संघात भाजपच्या सुनील मेंढे यांना तर काँग्रेसकडून डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून विद्यमान खासदार अशोक नेते यांची तर महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. दरम्यान, नागपूरच्या लोकसभा मतदारसंघातले काँग्रेसचे उमेदवार आमदार विकास ठाकरे आपला उमेदवारी अर्ज आज जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करणार आहेत. तर भाजपाकडून ज्येष्ठ नेते नितीन गडकरी आपला उमेदवारी अर्ज उद्या दाखल करणार आहेत. नागपूर ग्रामीणचा भाग असलेल्या रामटेक मतदार संघामध्ये काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान नागपूर जिल्ह्यातील उमरेडचे काँग्रेसचे आमदार राजू पारवे यांनी आपल्या पक्ष सदस्यत्वाचा तसंच आमदारकीचा राजीनामा दिला असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात नुकताच प्रवेश केला आहे.

**ठाणे**

धूलिवंदन म्हणजेच रंगांचा सण काल देशभर उत्साहात साजरा करण्यात आला. अयोध्येतील श्रीराम मंदिरात प्रथमच रंगोत्सव साजरा झाला. मथूरेतही काल द्वारकाधीश मंदिरात विविध रंगबेरंगी फुलांची उधळण करत हजारो भाविकांच्या उपस्थितीत रंगोत्सव साजरा करण्यात आला.

राज्यातही रंगांचा हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील टेंभी नाक्यावर धुलीवंदन साजरे केले. नैसर्गिक रंगांचा वापर करत धुळवड साजरी करुया असं आवाहन करत मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या

वाशिम जिल्ह्यातील बंजारा समाजाचा होळी उत्सव सध्या सुरु आहे. हा उत्सव गुढीपाडव्यापर्यंत साजरा केला जातो. काल बंजारा तांड्यातील महिलांनी पारंपारिक पोशाख परिधान करून डफलीच्या तालावर बंजारा नृत्य करीत धुळवड साजरी केली. जालना शहरांत 135 वर्षांची परंपरा असलेल्या हत्तीची मिरवणूक काढण्यात आली. या काळात अनुचित प्रकार टाळण्यासाठी नांदेडमध्ये सिडको भागात पोलिसांनी काल पथसंचलन केलं.

नंदुरबारमध्ये मोठ्या उत्साहात आदिवासी काठी संस्थानाचा रजवाडी होळी उत्सव झाला. देशपरदेशातून आलेल्या पर्यटकांनीही या उत्सवाचा आनंद लुटला.

यवतमाळमध्ये बंजारा समाज बांधवांनी हातात हात गुंफून गोलाकार फेर धरत गोरमाटी गाण्याच्या ठेक्यावर लेंगी नृत्याद्वारे होळी साजरी केली.

कोल्हापुरात अनेक संस्थानी पर्यावरणपूरक होळीसाठी शेणी दानाचा उपक्रम राबवला.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामध्ये जावयाला गाढवावर बसून त्याची गावामधून मिरवणूक काढण्याची अनोखी प्रथा गेल्या शंभर वर्षांपासून पाळली जाते. मिरवणूकीनंतर गावातील नागरिक जावयाचा मानसन्मान करतात तसंच भेटवस्तू देऊन गौरव करतात. कालही ही प्रथा केजमध्ये उत्साहात पार पडली.

रत्नागिरीत अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या खेड इथल्या कार्यकर्त्यांनी पाण्याने होळी पेटवून त्यामागचं विज्ञान उपस्थितांना सांगत अंधश्रद्धा निर्मूलनाचा अनोखा प्रयोग केला.

पुण्यात भोई प्रतिष्ठाननं आयोजित केलेल्या रंग बरसे या महोत्सवात एक हजार  विशेष मुलांनी रंग खेळत आनंद लुटला. अनाथ, एचआयव्हीग्रस्त, मतिमंद, आणि दिव्याग मुलं यात सहभागी झाली होती. पर्यावरण पूरक आणि नैसर्गिक रंगांचा वापर, युद्धात अपंगत्व आलेल्या सैनिकांचा आणि पोलीस, प्रशासनासह, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग हे या महोत्सवाचं वैशिष्ट्य ठरलं.

दरम्यान, भंडारा जिल्ह्याच्या कुडेगाव इथं  धुळवड साजरी करून वैनगंगा नदी पात्रात आंघोळीसाठी गेलेल्या 25 वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

**धनेश**

कोकणातील धनेश पक्ष्यांच्या संवर्धनाबाबत विचारमंथन करण्यासाठी देवरुख इथं गेल्या शनिवारी धनेशमित्र संमेलन घेण्यात आलं. धनेश पक्षाच्या ढोल्यांचं संरक्षण आणि संवर्धन आणि त्यांच्या अधिवासाचं पुनरुज्जीवन याविषयी यावेळी चर्चा झाली. सृष्टी ज्ञान संस्था, निसर्ग सोबती, देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, सह्याद्री निसर्ग मित्र, एन व्ही ईको फार्म आणि वन विभागाच्या सहकार्यानं हे संमेलन पार पडलं. या अनोख्या संमेलनाविषयी माहिती देताना सृष्टी ज्ञान संस्थेच्या संगीता खरात म्हणाल्या...

बाईट- संगीता खरात- १ मिनिट २६ सेकंद

**तुळजापूर-मतदान-पत्र**

तुळजापूर इथल्या नगर परिषदेच्या प्राथमिक शाळेतील ४५ विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मतदान करण्यासाठी साद घालणारं पत्र लिहिलं आहे. या पत्रामध्ये त्यांनी लोकशाहीचं आणि मतदानाचं महत्त्व, आपली कर्तव्य याविषयी माहिती दिली आहे. पत्रलेखनासाठी मुख्याध्यापक गणेश रोचकरी आणि इतर शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन केलं. निवडणूक प्रक्रियेसंदर्भात जागृती निर्माण करण्यासाठी शाळेत निवडणूक गटाची स्थापनाही करण्यात आली आहे.

**रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूरच्या गंगेचं सहा महिन्यांनी पुन्हा एकदा आगमन झालं आहे. मुख्य काशिकुंडासह चौदाही कुंडांमध्ये गंगेचं पाणी प्रवाहित झालं आहे. गंगा आल्यानंतर देवस्थानात धार्मिक कार्यक्रम केले जातात. तसंच, विविध ठिकाणाहून भाविकही गंगास्नानासाठी या ठिकाणी येतात. २०१३ पूर्वी गंगेचं पाणी, साधारण तीन वर्षांनी येत असे त्यानंतरच्या काळात मात्र जवळपास दर वर्षी गंगा अवतीर्ण होत असून, सर्व कुंडांमध्ये पाणी भरुन राहत असल्याचं निदर्शनास आलं आहे. भूगर्भातली विशिष्ट रचना, हालचाली किंवा सायफनसारख्या यंत्रणेमुळे निसर्गाचा हा आविष्कार घडत असावा, असं काही भूगर्भशास्त्रज्ञांचं मत आहे.

**स्नेहाधार पुरस्कार**

सामाजिक समस्यांची जाण असलेल्या आणि त्या सोडवण्यासाठी झटणाऱ्या हातांना बळ देणं हे आपले कर्तव्य आहे, असं प्रतिपादन ज्येष्ठ लेखिका आणि अनुवादक वीणा गवाणकर यांनी नुकतंच पुण्यात केलं. अहमदनगर इथल्या स्नेहालय संस्थेच्या स्नेहाधार पुणे परिवाराच्या पुरस्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. श्रीगोंदा इथल्या महामानव बाबा आमटे संस्थेच्या माध्यमातून फासेपारधी जमातीमधील मुलांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या शुभांगी झेंडे आणि 'समाजबंध' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून 'महिला आरोग्य आणि मासिक पाळी' या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शर्वरी सुरेखा अरुण यांचा यावेळी स्नेहाधार गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

**धुळे-हातभट्टी**

धुळ्यातील राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकानं आर्णी आणि धनगरवाडी इथल्या अवैध हातभट्टी दारू कारखान्यावर छापेमारी करून १४ हातभट्टी निर्मिती केंद्र उध्वस्त केली. या प्रकरणी १५ गुन्हे नोंदवण्यात आले असून १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**अहमदनगर**

अहमदनगर इथं झालेल्या ७०व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत हरियाणानं भारतीय रेल्वे संघावर ३५-३० अशी मात करत विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. गादी प्रकारात काल झालेला हा अंतिम सामना पहाण्यासाठी नगरकरांनी मोठी गर्दी केली होती. हरियाणाच्या विजयात आशू मलिकनं महत्त्वाची भूमिका बजावली.

**हवामान**

राज्यात अनेक ठिकाणी उन्हाच्या झळा तीव्र होऊ लागल्या आहेत. विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनेक भागात कमाल तापमान ३९ ते ४० अंशांपर्यंत गेला आहे. येत्या २४ तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.